कै.मधुकरराजे निंबाळकर शिक्षण मंडळ, बारामती
संचलित संत सावतामाळी प्राथ. विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी
पत्ता : बारामती सोनगाव रोड, दळवी वस्ती, डोर्लेवाडी, ता. बारामती. मो. ९८५०२५७०००/९८६०१२३४७४

दि. ०९/१०/२०२१

## EPTA च्यासर्वसाधारण सभेची सूचना

कै. मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती संचलित संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी या विद्यालयाच्या पालक शिक्षक (EPTA) संघाची वार्षीक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २०/१०/२०२१ रोजी सकाळी ठिक १० वा. कोविड २०२० च्या पार्श्वभुमीवर योग्य ती खबरदारी घेऊन सोशल डिस्टंसींग पाळून विद्यालयात आयोजित करण्यात आलेली आहे. या सभेला सर्व पालकांनी हजर रहावे, ही विनंती.

### सभेचे विषय

१. विद्यालयाच्या मागील वार्षिक सभेचा इतिवृत्तांत कायम करण्याबाबत.

२. मागील वर्षातील शैक्षणिक फी जमा करणेबाबत.

३. विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे.

४. शैक्षणिक वर्षे वर्ष २०२१-२२ करिता शैक्षणिक फी ठरवणेबाबत.

५. आयत्या वेळचे विषय.

Blawale
PRINCIPAL
Sant Savatamali Primary School
(English Medium) Dorlewadi
U DISE CODE 27250211204
अध्यक्ष- EPTA कार्यकारी समिती
तथा मुख्याध्यापक

टीप : एकूण सभासदांपैकी ३/५ सभासद सभेस उपस्थित असतील, तर गणपूर्ती झाल्याचे समजण्यात येईल.

# कै.मधुकरराजे निंबाळकर शिक्षण मंडळ, बारामती

## संचलित संत सावतामाळी प्राथ. विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी

पत्ता : बारामती सोनगाव रोड, दळवी वस्ती, डोर्लेवाडी, ता. बारामती. मो. ९८५०२५७०००/९८६०१२३४७४

*** EPTA च्यासर्वसाधारण सभेची नोटीस मिळालेल्या सभासदांची यादी.***

कै. मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती संचलित संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी या विद्यालयाच्या बुधवार दि. २०/१०/२०२१ रोजी सकाळी ठिक १० वा. होणाऱ्या पालक शिक्षक (EPTA) संघाची वार्षीक सर्वसाधारण सभेची सुचना प्रत्यक्ष/फोन कॉल/ व्हॉट्स ॲपद्वारे मिळाली.

| अ. क्र. | कार्यकारी सदस्याचे नाव व पद | सही |
|---|---|---|
| १. | पृथ्वीराज सोमनाथ नवले<br>अध्यक्ष- EPTA कार्यकारी समिती तथा मुख्याध्यापक | Blawale |
| २. | सोमनाथ पोपट भिसे<br>सेक्रेटरी- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| ३. | गणेश तानाजी गावडे<br>उपाध्यक्ष- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | Ganesh |
| ४. | शितल सुनिल खोत<br>वर्गशिक्षक प्रतिनिधी- EPTA कार्यकारी समिती | [signature] |
| ५. | Ganesh Popat Mhetre<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| ६. | शंकर भिमा कोरे<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| ७. | वैशाली कैलास गुरकुंडे<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | Vaishali. |
| ८. | बाळासाहेब तुकाराम शरखाने<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| ९. | बापु वामन बनकर<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| १०. | रेश्मा लखन गवळी<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | RLGabali |
| ११. | Satish Tilkar<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | S.B.Til |

कै.मधुकरराजे निंबाळकर शिक्षण मंडळ, बारामती
संचलित संत सावतामाळी प्राथ. विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी
पत्ता : बारामती सोनगाव रोड, दळवी वस्ती, डोर्लेवाडी, ता. बारामती. मो. ९८५०२५७०००/९८६०१२३४७४

*** EPTA च्यासर्वसाधारण सभेला हजर असलेल्या सभासदांची यादी.***

कै. मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती संचलित संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी या विद्यालयाच्या बुधवार दि. २०/१०/२०२१ रोजी सकाळी ठिक १० वा. झालेल्या पालक शिक्षक (EPTA) संघाची वार्षीक सर्वसाधारण सभेची उपस्थिती.

| अ. क्र. | कार्यकारी सदस्याचे नाव व पद | सही |
|---|---|---|
| १. | पृथ्वीराज सोमनाथ नवले<br>अध्यक्ष- EPTA कार्यकारी समिती तथा मुख्याध्यापक | [signature] |
| २. | सोमनाथ पोपट भोंडे<br>सेक्रेटरी- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| ३. | गणेश नानाजी गावडे<br>उपाध्यक्ष- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | Ganesh. |
| ४. | शितल सुनिल खोत<br>वर्गशिक्षक प्रतिनिधी- EPTA कार्यकारी समिती | [signature] |
| ५. | बाळासाहेब तुकाराम शेरखाने<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | BSherkhan |
| ६. | S.B. Tilekar<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | S.B.Tilek |
| ७. | वैशाली कैलास गुरकुंडे<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | Vaishali. |
| ८. | रोहिन वाळू गजरमल<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | Anikt.. |
| ९. | शंकर धिमा कोरे<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| १०. | Ganesh Popat Mhetre<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | [signature] |
| ११. | रेश्मा लखन गवळी<br>सदस्य- EPTA कार्यकारी समिती तथा पालक प्रतिनिधी | RGavali |

कै.मधुकरराजे निंबाळकर शिक्षण मंडळ, बारामती
संचलित संत सावतामाळी प्राथ. विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी
पत्ता : बारामती सोनगाव रोड, दळवी वस्ती, डोर्लेवाडी, ता. बारामती. मो. ९८५०२५७०००/९८६०१२३४७४

---

** EPTA च्यासर्वसाधारण सभेचा वृत्तांत **

कै. मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती संचलित संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी या विद्यालयाच्या पालक शिक्षक (EPTA) संघाची वार्षीक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २०/१०/२०२१ रोजी सकाळी १० वा. कोविड २०२० च्या पार्श्वभुमीवर योग्य ती खबरदारी घेऊन सोशल डिस्टंसींग पाळून विद्यालयात घेण्यात आली. सभेचे अध्यक्षस्थान EPTA **कार्यकारी समितीचे अध्यक्ष तथा विद्यालायचे मुख्याध्यापक प्रृथ्वीराज नवले सर** यांनी स्वीकारले व सभा सुरू झाल्याचे घोषित केले. तत्पुर्वी अध्यक्षांनी असे नमूद केले की,
बालकांच्या मोफत व सक्तीचा शिक्षण हक्क अधिनियम २००९ (RTE ACT 2009) प्रमाणे EPTA ची सर्वसाधारण सभा शैक्षणिक वर्षे संपण्यापुर्वी एक महिन्याच्या आत घेणे आवश्यक आहे. मात्र सध्याची कोविड १९ ची जागतीक महामारीमुळे मागील वर्षीची सभा होऊ शकली नाही. तसेच सध्या ओसरी शाळा भरवण्यास शासनाने मंजुरी दिल्याने आपण ही EPTA ची पालक सभा आज घेत आहोत.

त्यानंतर त्यांनी क्रमानुसार सभेचे विषय चर्चेस घेण्यास सांगितले व सभेचे कामकाज सुरू केले.

**विषय क्र.१ : विद्यालयाच्या मागील वार्षिक सभेचा इतिवृत्तांत कायम करण्याबाबत.**
सभेच्या अध्यक्षांच्या परवानगीने सदर विषय चर्चेस मांडला व मागील सर्वसाधारण सभेचा वृत्तांत वाचून दाखविला. उपस्थित EPTA सभेला उपस्थित पालक प्रतिनिधी व पालक सभासदांनी त्याचे अवलोकन केले व त्यावर सविस्तर चर्चा केली. त्यानंतर तो योग्य असल्याने व तो सर्वांना मान्य असल्यने कायम करावा असा सर्वानुमते विचार झाला.
**ठराव : संस्थेच्या मागील सर्वसाधारण सभेचा इतिवृत्तांत वाचून तो कायम करण्यात आला.**

सूचक : सोमनाथ पोपट भिसे    अनुमोदक : गणेश नानाजी गावडे

ठराव सर्वांनुमते संमत.

**विषय क्र.२ : मागील वर्षातील शैक्षणिक फी जमा करणेबाबत.**
अध्यक्षांच्या परवानगीने मागील वर्षातील शैक्षणिक फी जमा करणेकामीचा विषय अवलोकनासाठी सभेत मांडला व त्यावर चर्चा करण्यात आली. चर्चेदरम्यान कोविडमुळे पालकांचे व्यवसाय बंद असल्याने तसेच शाळाही ऑनलाईन सुरु असल्याने सदर शैक्षणिक फी टप्प्या टप्प्याने भरणेची मुभा मिळावी अशी मागी सर्व पालकांनी केली. यावर विचार विनिमय झाला व सदर शैक्षणिक फी टप्प्या टप्प्याने भरणेची मुभा देण्यात आली.

कै.मधुकरराजे निंबाळकर शिक्षण मंडळ, बारामती

सलोनी पार्क, सेजल अपार्टमेंट, फ्लॅट नं. ८, देसाई इस्टेट, ता.बारामती, जि.पुणे

सार्वजनिक ट्रस्टचा रजिस्ट्रेशन नंबर– एफ/२२७६४/पुणे

---

**ठराव : मागील वर्षातील शैक्षणिक फी टप्प्या टप्पयाने जमा करणेबाबत सर्वानुमते मंजुरी देण्यात आली.**

**सूचक :** ............................... **अनुमोदक :** ...............................

**ठराव सर्वानुमते संमत.**

**विषय क्र.३ : विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शैक्षणिक प्रगतीचा आढावा घेणे.**

अध्यक्षांच्या परवानगीने सदर विषय चर्चेस घेतला व अशी माहिती दिली की, कोविडमुळे सर्वत्र मागील वर्षीपासून विद्यार्थ्यांचे ऑनलाईन वर्ग सुरु आहेत. इंटरनेटचे स्पिड, कमी शिकलेले पालक यामुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असून अनेक विद्यार्थी ऑनलाईन तासाला उपस्थित रहात नाहीत. जे विद्यार्थी ऑनलाईन तासाला गैरहजर असतील त्यांचे नुकसान होत आहे. त्यामुळे सर्व विद्यार्थ्यांनी ऑनलाईन तासाला हजर राहणेकामी पालकांनी मुलांना बंधन घालावे. तसेच मलं घरी मोबाईलचा दुरुपयोग करणार नाहीत याची सर्वांनी खबरदारी घ्यावी. यावेळी गुगल लिंकद्वारे घेण्यात आलेल्या परिक्षेचे निकाल जाहिर करण्यात आले. कोविड काळात ऑनलाईन धडे देऊन विद्यार्थ्यांचे शैक्षणिक टाळल्याकामी तसेच इतर शाळांप्रमाणे फी वसुलीसाठी तगादा न लावता फी भरणेकामी सवलत दिलेबद्दल पालक सभेने विद्यालायचे आभार मानले.

**ठराव : विद्यार्थ्यांच्या ऑनलाईन शैक्षणिक प्रगतीबाबत पालकांनी समाधान व्यक्त केले.**

**सूचक :** ............................... **अनुमोदक :** ...............................

**ठराव सर्वानुमते संमत.**

**विषय क्र. ४: शैक्षणिक वर्षे वर्ष २०२१–२२ करिता शैक्षणिक फी ठरवणेबाबत.**

सभेपुढे सदर विषय चर्चेस घेतला व मागील वर्षात मंडळाच्या झालेल्या कामाबाबत चर्चा केली. दरम्यान अशी माहिती दिली की, कोरोना साथीमुळे पालकांनी फी भरलेली नाही. त्यामुळे विद्यालयवार शिक्षकांचे कर्मचाऱ्यांचे पगार, इमारत बांधकासाठी काढलेल्या कर्जाचे हप्ते, स्कुल बसचे हप्ते व अन्य बाबींमुळे मोठा आर्थिक ताण आला आहे. मात्र आता महामरीचा प्रसार थोडसा कमी झाल्यानंतर सर्वांनी आपापली मागील थकित शैक्षणिक फी टप्प्या- टप्प्याने का होईना मात्र भरणे गरजेचे आहे. विद्यालायाचे कामकाज सुरळीत चालणेकामी यापुढील वर्षीची फी मात्र सर्वांनी नियमीत भरावी. तसेच पालक सभेच्या मागणीनुसार

कै.मधुकरराजे निंबाळकर शिक्षण मंडळ, बारामती

सलोनी पार्क, सेजल अपार्टमेंट, फ्लॅट नं. ८, देसाई इस्टेट, ता.बारामती, जि.पुणे

सार्वजनिक ट्रस्टचा रजिस्ट्रेशन नंबर- एफ/२२७६४/पुणे

---

**कोवीड महामारी संपत नाही तोपर्यंत पुढील काही वर्षे कोणतीही शैक्षणिक फी वाढ करु नये अशी मागणी केली.** त्यावर सर्व सभा सदस्यांनी सविस्तर चर्चा केली. त्यानंतर तो निर्णय योग्य असल्याने व तो सर्वांना मान्य असल्याने कायम करावा असा सर्वानुमते विचार झाला.

**ठराव : शैक्षणिक वर्षे २०२१-२२ करीता तसेच कोविड महामारी संपेपर्यंत मागील वर्षीप्रमाणे २० हजार रुपये एवढेच शैक्षणिक शुल्क आकारण्याचा निर्णय झाला.**

**सूचक :** ................................ रोहित बाळू गजरमल

**अनुमोदक :** ................................ बापू वामन बनकर

**ठराव सर्वानुमते संमत.**

**विषय क्र. ५:- आयत्या वेळचे विषय.**

सभेपुढे कुठलाही विषय नसल्याने कै. मधुकरराजे निंबाळकर शिक्षण प्रसारक मंडळ, बारामती संचलित संत सावतामाळी प्राथमिक विद्यालय (इंग्रजी माध्यम), डोर्लेवाडी या विद्यालयाच्या पालक शिक्षक (EPTA) संघाच्या वार्षीक सर्वसाधारण सभा अध्यक्ष तथा मुख्याध्यापक प्रृथ्वीराज नवले सर यांनी सभा संपल्याचे जाहीर केले.

अध्यक्ष

कै.मधुकरराजे निंबाळकर शिक्षण मंडळ, बारामती